S.O. File 2017

2083

‘ड’ वर्ग महानगरपालिकेसाठी मंजूर असलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये रहिवास विभागात ‘एलपीजी पंप’ हा वापर अनुज्ञेय करण्याबाबत...

# नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

**मध्यवती कार्यालये, पुणे ४११ ००१**

**दि.२८/११/२०१७.**

## आदेश

ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका सोडून राज्यातील उर्वरित सर्व ‘ड’ वर्ग दर्जाच्या महानगरपालिकांसाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. TPS-1812/CR-112/12/DCR D-Class/Ud-13, dt. 20/9/2016 अन्वये मंजूर करण्यात आली असून ती दि. २९.०९.२०१६ पासून अंमलात आली आहे (यापुढे “उक्त नियमावली” असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीतील इतर इमारतींसाठी (Other Buildings) सामासिक अंतरे विहीत करण्यात आलेल्या विनियम क्र. २६.२.२ तक्ता क्र. ९ अ मधील अ.क्र.५ येथे “Petrol / Fuel Feeling Stations” या प्रयोजनासाठीच्या तरतूदी विहीत केलेल्या असून सार्वजनिक / निम-सार्वजनिक या जमीन वापर विभागामध्ये विनियम क्र. २५.५ (viii) अन्वये, आणि शेती तथा नाविकास या जमीन वापर विभागामध्ये विनियम क्र. २५.६ (A) (xxvi) अन्वये, “Petrol/LPG/ CNG Pumps” हा वापर काही अटींसापेक्ष अनुज्ञेय आहे; तथापि, रहिवास जमीन वापर विभागातील अनुज्ञेय वापर दर्शविणा-या, विनियम क्र. २५.२ (C) (यापुढे “उक्त विनियम” असे संबोधिले आहे) या तरतुदीमध्ये ‘एलपीजी पंप’ हा वापर अनुज्ञेय असल्याविषयीची स्पष्टता दिसत नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त विनियमामध्ये ‘एलपीजी पंप’ हा वापर अनुज्ञेय असल्याविषयीची स्पष्टीकरण करण्याची विनंती संचालक, नगर रचना यांचेकडे प्राप्त झाली आहे;

2/12/17

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीप्रमाणेच पुणे व नाशिक शहरांच्या, मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये, इतर इमारतींसाठी (Other Buildings) सामासिक अंतरे

विहीत करण्यात आलेल्या अनुक्रमे विनियम क्र. १७.२.२.२ तक्ता क्र. ७ मधील अ.क्र.५ येथे, व विनियम क्र. १५.२.२ तक्ता क्र. ८ मधील अ.क्र.५ येथे, "Petrol / Fuel Feeling Stations" या प्रयोजनासाठी तरतूदी विहीत करण्यात आलेल्या असून सार्वजनिक व निम-सार्वजनिक या जमीन वापर विभागामध्ये अनुक्रमे विनियम क्र. १६.१० (A) (vii) व विनियम क्र. १४.८ (viii) अन्वये, त्याचप्रमाणे शेती तथा नाविकास या जमीन वापर विभागामध्ये अनुक्रमे विनियम क्र. १६.७ (vi) व विनियम क्र. १४.६ (xx) अन्वये, "Petrol/LPG/ CNG Pumps" हा वापर अनुज्ञेय आहे, त्याशिवाय राज्यातील नगरपरिषदांसाठीच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये देखील याप्रमाणेच तरतुदी असल्याचे दिसून येते;

आणि ज्याअर्थी, रहिवास जमीन वापर विभागामध्ये, बृहन्मुंबई साठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र्. 52 (c) (8) (ii) अन्वये " Filling and Service Station of Petrol, Disel, Compressed Natural Gas and /or any other Motor Vehicle Fuel" हा वापर अनुज्ञेय आहे. ठाणे शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र्. M-3 (8) (ii) अन्वये "Petrol/Gas/C.N.G. Filling" हा वापर अनुज्ञेय आहे. त्याचप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशातील बृहन्मुंबई वगळता उर्वरित सर्व महानगरपालिकांसाठी कलम ३७ (१कक) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या प्रारुप सर्वसमावेशक व एकात्मिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (यापुढे "उक्त MMR मधील प्रारुप नियमावली" असे संबोधिले आहे) विनियम क्र. ३.२.३ अ. क्र. १६ अन्वये "Petrol, Disel, CNG, LPG Filling Stations" हा वापर, अनुज्ञेय करण्याचे प्रस्तावित आहे;

आणि ज्याअर्थी, वर नमूद केल्यानुसार बृहन्मुंबई, ठाणे तसेच उक्त MMR मधील प्रारुप नियमावली, यांसाठीच्या नियमावलींमध्ये रहिवास जमीन वापर विभागामध्ये LPG Pump अनुज्ञेय असल्याचे दिसून येते तसेच पुणे, नाशिक, उक्त 'ड' वर्गची नियमावली व नगरपरिषदांसाठीची नियमावली, या सर्व नियमावलींमध्ये इतर इमारतींसाठी (Other Buildings) च्या समास अंतरे सोडण्याच्या विनियमामध्ये fuel filling station हा वापर काही अटींसापेक्ष अनुज्ञेय असल्याची तरतूद विचारात घेता व LPG हे देखील एक इंधन (Fuel) असल्याने उक्त नियमावलीमध्ये देखील सर्वच विकसनशील जमीन वापर विभागामध्ये LPG

pump हा वापर अन्यथाही अनुज्ञेय असल्याचा अन्वयार्थ निघतो; तसेच वर नमूद सर्वच नियमावलींमध्ये सार्वजनिक / निम-सार्वजनिक या, रहिवास जमीन वापर विभागाशी विकसनशीलतेत, समकक्ष असलेल्या जमीन वापर विभागामध्ये LPG pump अनुज्ञेय असलेने वरील अन्वयार्थास पुष्टी मिळत असल्याचे देखील दिसून येते;

आता त्याअर्थी, वर सविस्तर नमूद केलेल्या तरतुदी विचारात घेता, उक्त नियमावलीमधील रहिवास वापरामध्ये अनुज्ञेय असलेल्या वापरांसाठीच्या यादीमध्ये देखील सर्व प्रकारच्या इंधन (Fuel) च्या पंपाचा वापर अनुज्ञेय असल्याचा अन्वयार्थ निघतो, ही बाब विचारात घेता रहिवास वापरासाठीच्या यादीमध्ये, LPG Pump अनुज्ञेय असल्याविषयीच्या अन्वयार्थाची अधिक स्पष्टता होण्याच्या दृष्टीकोनातुन, असा वापर अनुज्ञेय असल्याविषयीचे स्पष्टीकरण करणे योग्य राहील असे संचालक, नगर रचना यांचे मत झाले आहे;

म्हणून आता, उक्त नियमावलीतील विनियम/तरतूदींच्या अन्वयार्था बाबत निर्णय घेऊन विनियम क्र. २१ अन्वये स्पष्टीकरण (Clarification) देण्याबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांना असलेल्या अधिकारात, उक्त नियमावलीतील रहिवास जमीन वापरामध्ये अनुज्ञेय असलेल्या वापरांच्या यादीमध्ये, LPG Pump हा वापर अनुज्ञेय करण्याविषयी खालीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक आदेश पारित करीत आहेतः-

**आदेश**

उक्त नियमावलीतील उक्त विनियमामधील अ.क्र. (ii) Petrol Filling and CNG Service Stations या वापरामध्ये 'LPG Pump, subject to the provisions as prescribed in, sr. no. 5 of table no.9a of regulation no. 26.2.2 and, regulation no. 25.6 (A) (xxvi)', असा वापर देखील अनुज्ञेय राहील, असे समजण्यात यावे.

*(मूळ मसूदा मा. संचालकांनी मंजूर केला असे)*
जा.क्र.'ड' वर्ग / स्पष्टीकरण/एलपीजी पंप/टिपीव्ही-७/६२८७
दिनांक-२५/११/२०१७.

(सुनिल पुं मरळे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता